Volume-2 (2021)
Issue-2 (September-2021)
**RESEARCH HUB**
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN
2582-9173

# २१ वे शतक आणि मानवी विकासातील असमानता

**डॉ. राष्ट्रपाल गणवीर**
महिला महाविद्यालय
१५२, नंदनवन, नागपूर
९८२२२०३०४१
rashtrapalganvir@gmail.com

.......................................................................................................................................................................

**सारांश:—**

व्यक्ती, कुटुंबे, समुदाय, राष्ट्रे, क्षेत्रीय समाजिक, आर्थिक संघटना, बहुपक्षीय आंतरराष्ट्रीय संघटना आणि संस्थांच्या प्रयत्नांमुळे २० व्या शतकात सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक क्षेत्रांमध्ये असमानतेच्या स्वरूपात काही प्रमाणात कमी आली. परिपूर्ण वैद्यकीय आरोग्य, मूलभूत आरोग्य सेवा, प्रारंभिक शिक्षा आणि सार्वजनिक सुविधांची उपलब्धता मोठया प्रमाणात सुधारली आहे. परंतु प्रत्यक्षात विचार केल्यास विविध देशांमध्ये किंवा देशांच्या अंतर्गत क्षेत्रांमध्ये आणि मानवी विकासाच्या विभिन्न घटकांच्या अंतर्गत अनेक प्रकारच्या असमानतांची दरी मोठया प्रमाणात विस्तृत झालेली दिसून येते. उत्पन्न आणि संपत्तीच्या वितरणामध्ये व्यापक असमानता दिसून येते जी शेवटी राहणीमान, मानवी विकास, मूलभूत सुविधांचा वापर इत्यादी प्रतिबिंबित करते.

विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या बाबतीत २१ वे शतक विसाव्या शतकापेक्षा खुप पुढे आहे. औद्योगिक विकासाच्या बाबतीत जिथे दुसऱ्या विकसित देशातील उद्योग ४.० (बृहत आकडा समुह, सिम्युलेशन, इंटरनेट ऑफ सर्विसेस, ऑगमेंटेड रिएलिटी, सायबर फिजिकल सिस्टीम्स, एडिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग, इंटरनेट फॉर थिंग्ज, क्लाऊड कम्प्यूटिंग ऑटोनामस रोबोट, थ्रिडी प्रिंटिंग) च्या दिशेने वाटचाल करीत आहेत तर अविकसित देश ३.० च्या दिशेने वाटचाल करीत आहेत. अशाच प्रकारची असमानता सर्विसेज ४.० व कृषी ४.० (हायड्रोपोनिक्स, एल्गी फीड स्टॉक, बायो प्लॅस्टिक, वर्टिकल फॉर्मिंग, ड्रोन टेक्नॉलॉजी, डाटा अनालिसिस,इंटरनेट ऑफ थिंग्स, प्रिसिजन ॲग्रिकल्चर, वाटवंटातील शेती, समुद्राच्या पाण्यापासून शेती, जेनेटिक मॉडिफिकेशन्स, कल्चरड मॉस, ३ डी प्रिंटिंग, नैनो टेक्नॉलॉजी, आर्टीफिशिअल इंटेलिजन्स, फुडशेअरिंग ॲड क्राऊडफार्मिंग आणि ब्लॅक चेन) ची आहे.

२१ व्या शतकात दोन देशांमध्ये आणि देशांच्या अंतर्गत क्षेत्रात उच्च शिक्षण, तांत्रिक शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, माहिती तंत्रज्ञान, संगणक सॉफ्टवेअर, उर्जेचे स्वच्छ व उपयोगी संसाधने, जीवनाची सुरक्षा आणि पोषण स्तरावरची असमानता अस्तित्वात राहिल किंवा त्यात वाढ सुद्धा होऊ शकेल.

संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम द्वारा प्रकाशित केलेला मानव विकास अहवाल २०१९ असे सुचित करते की, जगातील काही विकसित देशांमध्ये वयाच्या ४० व्या वर्षी उत्पन्न वितरणातील सर्वात आधी १ टक्के उत्पन्न आणि खालच्या स्तराच्या १ टक्के उत्पन्न वितरणात जीवन पद्धतीतील अंतर पुरूषांमध्ये १५ वर्ष तर महिलांमध्ये १० वर्ष दर्शविते.

मानवी विकासातील अशाप्रकारची असमानता समाजाला नुकसान पोहचवित असते. त्यामुळे सामाजिक समता दुर्बल होते तसेच सरकारे, संस्था आणि राजकीय नेतृत्वाप्रती लोकांचा विश्वास कमी होतो. मानवी विकासातील ही असमानता संयुक्त राष्ट्र संघाच्या २०३० पर्यंत संपोषणीय विकास अजेंडयाला प्राप्त

करण्याची सर्वात मोठी अडचण आहे. या असमानतेचा आकार व घातकता उत्पन्न व संपत्तीच्या असमानतेपेक्षाही खुप मोठी आहे.

**प्रस्तावना:—**

**२१ व्या शतकाच्या पहिल्या दोन दशकात मानवी विकासाच्या असमानतेची स्थिती :—**

अनेक लोक मानवी विकासाच्या सर्वात खालच्या स्तरावरून वर आलेले आहेत तरीही मोठया प्रमाणात असमानता आजही अस्तित्वात आहे. आपल्या इच्छेनुसार शालेय अभ्यासक्रमात प्रवेश घेवून शिक्षण मिळविणे, आपल्या क्षमतेनुसार आणि कौशल्यानुसार रोजगार मिळविणे, आपल्या इच्छेनुसार भोजन घेणे इत्यादी जगातील कोट्यवधी लोकांसाठी एक दिवास्वप्न आहे. अधिक उंच मानवी विकासाचा स्तर असलेल्या देशांमध्ये सन २००० मध्ये जन्मलेल्या मुलांपैकी २०२० पर्यंत ५५ टक्के मुले उच्च शिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेत आहेत. तर कमी मानवी विकास असलेल्या देशांत सन २००० मध्ये जन्मास आलेल्या मुलांपैकी १७ टक्के मुले तर आपल्या वयाची २० वर्षे पूर्ण करण्याआधीच मृत्यू पावले. ८० टक्के मुले उच्च शिक्षणापर्यंत सुद्धा पोहचू शकले नाहीत आणि फक्त ३ टक्केच मुले उच्च शिक्षण घेवू शकले.

२० व्या शतकात असलेल्या अनेक असमानता आता कमी होत आहेत. परंतु २१ व्या शतकात मानव विकासात अनेक गंभीर असमानता जन्मास येत आहेत. जसे, जलवायू संकट, तंत्रज्ञानाच्या बदलांमधील असमानता, वाढत्या क्षमतांमध्ये असमानता इत्यादी.

शक्ती असंतुलनाचा परिणाम म्हणून मानवी विकासाची असमानता आयुष्यभर संचित होत राहाते. समाज, अर्थव्यवस्था आणि राजकीय संरचनांमधील गंभीरपणे अविभाजित घटक मानवी विकासाची असमानता एकत्रितपणे वाढवतात. जर लोकांची उत्पन्नाची क्षमता आधीच कमकुवत असेल तर मानवी विकासाची असमानता कमी करण्यासाठी देश आणि समाजाजील पायाभूत सुविधांमध्ये मूलगामी बदल घडवावे लागतील.

२१ व्या शतकात मानवी विकासातील असमानता कमी केली जाऊ शकते. आर्थिक सत्ता असंतुलन राजकीय प्रभावाखाली येण्यापूर्वी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रभावी पावले उचलली जाणे आवश्यक आहे.

मानवी विकासातील असमानतेचे मूल्यांकन करण्यासाठी मॅट्रिक्समध्ये क्रांतीकारक बदल करण्याची आवश्यकता आहे. खालील प्रकारच्या असमानतेचे निराकरण केवळ एका स्वतंत्र आणि विशिष्ट विश्लेषणाद्वारे केले जाऊ शकते.

**२१ व्या शतकातील मानवी विकासाची असमानता आणि संभाव्य असमानता:—**

२१ व्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांच्या अनुभवावरून असे दिसून येते की, जागतिक, राष्ट्रीय आणि प्रादेशिक स्तरावर मानवी विकासामध्ये बऱ्याच असमानता आहेत ज्या एखाद्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय कारणांमुळे व्यक्तीच्या जन्मापासून तर वर्तमानापर्यंत एकत्रितपणे जोडल्या गेलेल्या आहेत आणि त्याच्या मूळ क्षमतांना प्रभावित करीत आहेत. या असमानता खालील प्रमाणे आहेत.

- जन्मापासून एक वर्षापर्यंत जगणे
- जन्माच्या वेळेस आयुर्मान
- प्राथमिक शिक्षण
- आरोग्याची पातळी आणि राहणीमानाची स्थिती

- स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छ आणि आरोग्यासाठी अनुकुल घर
- पौष्टीक पातळी
- उत्पन्न आणि रोजगाराची सुरक्षा
- कुशल शिक्षण
- सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात निर्णय घेण्यात सहभाग

युनो विकास कार्यक्रम द्वारा जारी करण्यात आलेला मानव विकास अहवाल—२०१९ आणि इतर संशोधन परिणाम हे सांगतात की, गेल्या दशकात वरील असमानता कमी झाली आहे. परंतु या अहवालाचा सखोल अभ्यास केल्यास असे निदर्शनास येते की, सर्वच क्षेत्रातील असमानता आज कायमच नसून त्यात वृद्धी झाल्याचे दिसून येते.

२१ व्या शतकातील मानवी विकासाचे स्वरूप वर्धित क्षमतांचे आहे. त्यापैकी प्रमुख म्हणजे—

- सर्व स्तरावर गुणवत्ता युक्त स्वास्थ्यावर प्रवेश
- सर्व स्तरांवर उच्च गुणवत्तेच्या शिक्षणापर्यंत प्रवेश
- अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी प्रवेश
- अज्ञात नवीन धक्क्यांच्या प्रती तणाव

**भावी २१ व्या शतकातील असमानतेचे स्वरूपः—**

समाजिक, आर्थिक, राजकीय आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर होत असलेल्या बदलांचा मानवी विकासाच्या गरजेवर परिणाम होणे स्वाभाविक आहे. मानव विकास अहवाल २०१९ मध्ये पुढील दोन क्षेत्रात होत असलेल्या जागतिक बदलांच्या परिणामाचा आणि मानवी विकासाच्या असमानतेचा उल्लेख आहे—

**१. हवामानातील बदल आणि अँथ्रोपोसिन मधील असमानताः—**

जलवायु संकटात आहे. जागतिक तापमानात वाढ, हिमालयातील पितळण्याचे प्रमाण वाढणे, उष्णतेच्या लाटा मोठया प्रमाणात तयार होणे, वेगाने तयार होणारे मानवी वादळ, जंगलातील आग हे सर्व हवामानातील बललाचे परिणाम आहेत. याचा सर्वांवर एकसारखा प्रभाव पडणार नाही, ना समान रूपात, ना एकत्रीत, ना एकरूपात हा परिणाम होणार. गरीब देश आणि गरीब लोक यामुळे सर्वात आधी आणि खुप अधिक प्रमाणात प्रभावित होतील. जगातील काही देशांचे आणि क्षेत्रांचे अस्तित्वच समाप्त होण्याची शक्यता आहे. त्याचा जास्तीत जास्त परिणाम भावी पिढयांवर होईल जो जीवाश्म ईंधनावर निर्भर असलेल्या विकासाचा परिणाम पुर्वीच्या पिढयांपर्यंत पोहोचेल. हवामानाशी संबंधीत असमानता पुढील प्रकारच्या असतील—

उत्सर्जनातील असमानतेच्या प्रभावातून निर्माण होणारी असमानता—हवामान अन्यायाचे दोन परिणाम. हवामानातील बदलअनुकुलन क्षमतेमधील भिन्न मार्ग—मूलभूत क्षमतांमध्ये गंभीरता, उन्नत क्षेत्रांमध्ये विखुरलेपणा.

२१ व्या शतकाच्या अखेरिस जगभरात होणाऱ्या हवामानातील बदलांमुळे दरवर्षी कोरडया दुष्काळाच्या १.४ अब्ज घटनांमध्ये वाढ होण्याची शक्यता वाढली आहे आणि अतिवृष्टीच्या २ अब्जाहून अधिक घटना घडतील ज्यामुळे पुरांचे धोके सुद्धा वाढतील.

**१. तांत्रिक बदलः—**

सध्या बहुतेक लोकांचा असा विश्वास आहे की, वैज्ञानिक आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात होणाऱ्या बदलांमुळे नवीन जग निर्माण होईल आणि असमानतेची पातळी कमी होईल. परंतु जागतिक आणि घरगुती पातळीवर उत्पन्न आणि संपत्तीच्या वितरणाचे असमान स्वरूप उद्योग, कृषी आणि सेवा क्षेत्रातील उत्पादन आणि वितरणामध्ये असमानता वाढवेल.

- ऑटोमेशन आणि कृतिम बुद्धीमत्ता यासारख्या तंत्रामुळे उत्पादन प्रक्रियेत मानवी श्रमांची जागा मशीनद्वारे घेतली जाईल ज्यामुळे कामगार बाजारात विसंगती निर्माण होतील.
- गरीब देश आणि गरीब लोकांना नवीन तंत्रज्ञानावर मर्यादित प्रवेश आहे ज्यामुळे भविष्यात असमानतेचे अंतर वाढेल.
- तंत्रज्ञान जीवनाचे आकार बदलत आहे ज्यामुळे केवळ अर्थव्यवस्थाच नव्हे तर समाज आणि अगदी राजकारण देखील.
- अशी आशंका व्यक्त केली जात आहे की, नवीन तंत्रज्ञानाद्वारे उत्पादित उत्पादन प्रक्रियेत एकूण उत्पन्नातील कामगारांचा वाटा कमी होईल आणि कंपन्यांचा नफा वाढेल.
- स्वयंचलित वाहन—सामायिकरण वाहने (ओला, उबेर) येत्या काही वर्षात खासगी वाहनांची संख्या कमी करू शकतात. यामूळे शहरांच्या गर्दी असलेल्या ठिकाणी पार्किंगचा प्रश्न सुटेल.
- इलेक्ट्रिक वाहने आणि नूतनीकरण योग्य उर्जा वाहने सुरू केल्याने जीवाश्म ईंधन—पेट्रोल व डिझेलची मागणी कमी होईल.
- उपरोक्त बदल ऑटोमोबाईल उद्योग, धातू उद्योग, विमा उद्योग आणि जीवाश्म इंधन आधारित ऊर्जा क्षेत्रातील विघटनकारी असतील तसेच स्थानिक पातळीवर आणि जागतिक पातळीवर असमानता निर्माण करतील. कारण गरीब आणि कमकुवत आर्थिक स्थिती असलेले लोक जास्त किंमतीमुळे त्यांच्यापासून वंचित राहतील.
- २१ वे शतक हे रोबोटिक्सचे युग असेल जे अनेक कारखानदार नोकरीमध्ये ऑटोमेशनचा वापर करतील ज्यामुळे शेवटी कामगार विस्थापित होतील. इंटरनेट ऑफ थिंग्जद्वारे ५—जी टेलिकॉम तंत्रज्ञानामुळे कारखान्यामधील मशीन आपापसात संवाद साधू शकतील. यामुळे उत्पपदकता वाढेल. परंतु त्याचा मोठा भाग मात्र कंपन्यांना मिळेल.

**डेटा मिररमध्ये मानवी विकासाची असमानता:—**

- जगतिक दारिद्रयता (अतिनिर्धनता) वर्ष १९९० मध्ये ३६ टक्केच्या पातळीवरून कमी होवून २०१८ मध्ये ९ टक्केच्या पातळीवर आली आहे. (विश्व बँकेच्या नुकत्याच झालेल्या सर्वेक्षणानुसार कोव्हिड—१९ जागतिक महामारी मुळे जगातील जवळपास ६० दशलक्ष लोक जे दारिद्रयाच्या दुष्टचक्रातून बाहेर निघाले होते ते पुन्हा दारिद्रयाच्या जोखडात अडकतील.)
- निम्न मानव विकास असणाऱ्या देशांमध्ये राहणाऱ्या लोकांची संख्या वर्ष २००० मध्ये २.१ अरब होती ती कमी होवून २०२० मध्ये ती मात्र ०.९२३ अरब राहिली.
- जन्माच्या वेळेस आयुर्मान हे आरोग्याच्या असमानतेचे विश्लेषण करण्याचे सर्वात महत्वाचे सुचक आहे. हे मानवी विकास निर्देशांकाचे सह—सुचक आहे आणि दीर्घकालीन व आरोग्य जीवनाचा प्रॉक्सी उपाय आहे.
- १९५० च्या दशकात जन्माचे आयुष्य ४७ वर्ष होते, जे २०२० मध्ये ७२ वष झाले आहे.

- जगतिक स्तरावर एकूण लोकसंख्येमध्ये ६० वर्षापेक्षा जास्त वयाच्या लोकांचे प्रमाण वाढत आहे.
- पूर्व प्राथमिक शिक्षण आणि उच्च शिक्षणातील असमानता वाढत आहे.
- आज ५.४ दशलक्ष मुले, त्यापैकी निम्म्याहून अधिक नवजात मुले ५ वर्ष देखील जगू शकत नाहीत. जर परिस्थिती अशीच राहिली तर वर्ष २०३० मध्ये मरण पावणाऱ्या मुलांची संख्या सुमारे ३ दशलक्ष होईल.
- सन २०१७ मध्ये जगभरातील २६२ दशलक्ष मुले आणि किशोरवयीन मुले शाळांमध्ये शिक्षण घेत नव्हती. शाळाबाह्य मुलांचे प्रमाण २०१७ मधील १८ टक्क्यांवरून २०३० मध्ये १४ टक्क्यांपर्यंत कमी होण्याची शक्यता आहे.
- २१ व्या शतकात मानवी विकासाचे वैधानिक पैलू निश्चित करण्यासाठी सन्माननीय जीवनाचा शोध महत्वाचा आहे.
- सन २०१७ मध्ये संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाद्वारे केलेल्या एका सर्वेक्षणात ४१ टक्के लोकांनी असे म्हटले आहे की, गेल्या एक वर्षाच्या कालावधीत त्यांना विविध स्तरांवर न्यायपूर्ण व सम्मानजनक वागणूक देण्यात आली नाही.
- क्षैतिज असमानतेमुळे हिंसक संघर्ष आणि गृहयुद्धांसह राजकीय उलथापालथ उद्भवू शकते.
- हिंसक संघर्षापूर्वी, हिंसक संघर्षादरम्यान आणि हिंसक संघर्षानंतरच्या काही वर्षात क्षैतिज असमानता वाढते.
- आज  जगात असा एकही देश नाही जेथे मानवी विकासामध्ये असमानता नाही.
- वर्ष १९८०—२०१६ या काळात श्रीमंत आणि गरीब देशांच्या पहिल्या एक टक्के आर्थिक उच्चभ्रू वर्गाने प्रचंड नफा कमविला.
- जागतिक स्तरावर उत्पन्नापेक्षा संपत्तीची एकाग्रता जास्त आहे. २०१७ मध्ये जगातील पहिल्या १० टक्के लोकांकडे ७० टक्के संपत्ती होती तर खालच्या स्तरावर असलेले ५० टक्के लोकांजवळ मात्र २ टक्के संपत्ती होती.
- आरोग्य, शिक्षण, उत्पन्न देणाऱ्या संधी आणि राजकीय हक्क व सहभाग, सामाजिक निर्णय घेतांना आणि विकासामध्ये बदल घडवून आणू शकतात.
- पशूधन भू—संसाधनांचा जगातील सर्वात मोठा शेतीचा उपयोग करणारा आहे.
- जगातील कृषी क्षेत्राद्वारे उत्सर्जित ग्रीन हाऊस वायूंपैकी ८० टक्के पशुधन उत्पादनापासून होत असते.

**निष्कर्ष:—**

कोव्हिड—१९ जागतिक महामारी सारख्या अपवादात्मक परिस्थितीत शैक्षणिक संस्था अनिश्चित काळासाठी बंद झाल्यास दर्जेदार इंटरनेट आणि संगणकाशिवाय गरीब वर्गातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणापासून वंचित ठेवले जाईल. भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये अजूनही डिजिटल वंचितपणा खूप जास्त आहे. इंटरनेट आणि मोबाईल असोसिएशन ऑफ इंडिया आणि नीलसन यांनी नोव्हेंबर २०१९ मध्ये प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार भारतातील ग्रामीण आणि शहरी भागात सक्रिय इंटरनेट वारणाऱ्यांची संख्या २२.७ करोड आणि २०.५ करोड आहे. भारतात ५० दशलक्ष स्मार्ट फोन आहेत. याचा अर्थ असा की, भारताती निम्म्याहून अधिक लोकसंख्येसाठी ऑनलाईन शिक्षण किंवा टेलिमेडिसिन शिक्षणाचे रस्ते बंद

आहेत. तांत्रीक बदल सेवा क्षेत्रात, कृषी क्षेत्रात क्रांतीकारी बदल घडवून आणतील. परंतु त्यांच्या उच्च खर्चामुळे जगातील कोटयावधी लोकांच्या प्रवेशातील मर्यादा कमकुवत होईल.

**संदर्भ ग्रंथ सुची :—**

१. मानव विकास अहवाल—२०१९
२. इंटरनेट आणि मोबाईल असोसिएशन ऑफ इंडिया आणि नीलसन अहवाल—नोव्हेंबर २०१९
३. दैनिक वर्तमान पत्रे—लोकमत, सकाळ, लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स
४. प्रतियोगिता दर्पण—मासिक

.